**बृहन्मुंबई महानगरपालिका**

**रा.ए.स्मारक रुग्णालय, परेल , मुंबई – 12**

क्र. केईएम /पी/ 511/ ओडी दिनांक: 05/08/2025

**जाहिरात**

मा. महानगरपालिका आयुक्त यांच्या मंजुरी क्र. एमजीसी/एफ/7076/डी,दि.01.07.2025 नुसार, रा.ए.स्मारक रुग्णालयाकरिता खालील नमूद करण्यात आलेली विविध पदे निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात भरावयाची आहेत. सदर पदाकरीता जाहिरात रा.ए.स्मा.रुग्णालयाच्या स्थानिक सुचना फलकावर प्रसिध्द/प्रसारीत करण्यात येईल. प्रस्तुत जाहिरातीत नमुद केल्याप्रमाणे आवश्यक असलेली शैक्षणिक अर्हता/ पात्रता धारण करीत असलेल्या उमेदवारांकडून अर्ज मागविण्यात येत आहेत.

इच्छुक उमेदवाराने स्थानिक सुचना फलकावर प्रसिध्द केलेल्या अर्जाच्या व वैयक्तीक माहितीपत्राच्या नमुन्याची प्रत, नमुद शुल्क रुपये 933 /-(रुपये 790/- + 18% जीएसटी रु.143/-) **रा.ए.स्मारक** रुग्णालय, तळ मजला, रोख विभाग (रुम.नं.56) येथे भरुन सदर अर्जावर रोख विभागामार्फत पावती क्रमांकाची नोंद घेवून प्राप्त पावतीच्या मुळ प्रतीसह पूर्ण भरलेला अर्ज सोबत शैक्षणिक अर्हतेची सर्व कागदपत्रे जोडून दि. 05.08.2024 ते 14.08.2025 पर्यत कार्यालयीन वेळेत (सर्व शनिवार तसेच रविवार व सार्वजनिक सुट्‌टी वगळून) सकाळी 11:00 ते दुपारी 03.00 वाजेपर्यत, **रा.ए.स्मारक** रुग्णालयाच्या आवक/जावक विभागात प्रत्यक्ष सादर करावा.

विविध पदांसाठी अर्ज सादर करण्यापूर्वी उमेदवारांनी स्वत: खात्री करावयाची आहे की, ते अर्ज करीत असलेल्या पदासाठी विहित अर्हता / अटींची पुर्तता करीत असून सदर तात्पुरत्या स्वरूपातील पदाकरीता ते पात्र आहेत. तसेच अर्जदाराने जाहीरातीत नमूद अर्हतेबाबतची प्रमाणपत्रे अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे अन्यथा अर्ज अवैध ठरविण्यात येईल.

तात्पुरत्या स्वरूपातील पध्दतीने भरावयाच्या विविध पदांचा तपशील खालीलप्रमाणे –

कंत्राट कालावधी : **दि. 16.09.2025 ते 31.03.2027**

| **अनु. क्र.** | **पदाचे नाव** | **एकूण पदे** | **ठोक मानधन (प्रति माह)** | **शैक्षणिक अर्हता** |
|---|---|---|---|---|
| 1 | सहाय्यक वैद्यकीय अधिकारी (प्रस्ताव विभाग) | 13 | एम.बी.बी.एस. रु. 90,000/-<br><br>एम डी- रु.1,00,000/- | 1. उमेदवार मान्यता प्राप्त विद्यापीठाची एम.बी.बी.एस. पदवी प्राप्त केलेला असावा.<br>2. उमेदवार हा महाराष्ट्र वैद्यकीय परिषद ( Maharashtra Medical council) यांचेकडे नोंदणीकृत असावा.<br>3. उमेदवाराने मान्यताप्राप्त रुग्णालयातून सहा महिन्यांचे दोन सत्र आवासी अधिका-याचे पद (House Post) किंवा एक वर्षाचे सलग निवासी वैद्यकीय अधिका-याचे पद (One year Residency Post) इतका अनुभव धारण केलेला असणे आवश्यक आहे.<br>4. उमेदवार माध्यमिक शालांत प्रमाणपत्र किंवा तत्सम किंवा उच्चतम परीक्षेत 100 गुणांचा मराठी विषय (निम्न स्तर किंवा उच्च स्तर) घेऊन उत्तीर्ण असावा.<br>5. उमेदवार 'डी.ओ.ई.ए.सी.सी.' सोसायटीचे 'सी.सी.सी.' किंवा 'ओ स्तर' किंवा 'ए स्तर' किंवा 'बी स्तर' किंवा 'सी स्तर' स्तरावरील प्रमाणपत्र किंवा महाराष्ट्र राज्य उच्च आणि तांत्रिकी शिक्षण मंडळाचे 'एम. एस. सी. आय. टी.' किंवा 'जी. ई. सी. टी.' चे प्रमाणपत्र धारक असावा. |

| अनु. क्र. | पदाचे नाव | एकूण पदे | ठोक मानधन (प्रति माह) | शैक्षणिक अर्हता |
|---|---|---|---|---|
| 2 | कनिष्ठ वैज्ञानिक अधिकारी (आयुर्वेदीक) (प्रस्ताव विभाग) | 2 | रु. 50,000/- | 1. मान्यताप्राप्त विद्यापिठाकडील आयुर्वेदातील पदवी.<br>2. आयुर्वेदातील पदवी संपादन केल्यानंतर रिसर्च मॅथडोलॉजीतील सहा महिन्यांचा संशोधन अनुभव<br>3. उमेदवारांस मराठी सुलभतेने वाचता, लिहिता आणि बोलता आले पाहिजे. क्लिनिकल फार्माकोलॉजी आणि ऍडव्हर्स ड्रग रिऍक्शन मॉनिटरिंग अनुभव असलेल्या उमेदवारास प्राधान्य देण्यात येईल.<br>4. उमेदवार महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाची शालांत परीक्षा वा तत्सम परीक्षा किमान 50 गुणांची प्रश्नपत्रिका असलेला मराठी विषय घेऊन उत्तीर्ण झालेला असावा.<br>5. उमेदवारांना संगणकाचे ज्ञान असणे आवश्यक आहे. त्याने/तिने डी.ओ.ई.ए.सी.सी सोसायटीचे (सी.सी.सी) किंवा (ओ स्तर) किंवा (ए स्तर) किंवा (बी स्तर) किंवा (सी स्तर) स्तरावरील प्रमाणपत्र किंवा महाराष्ट्र राज्य आणि तांत्रिकी शिक्षण मंडळाचे एम.एस.सी.आय.टी किंवा जी.ई.सी.टी. प्रमाणपत्र धारण करणे आवश्यक आहे. |
| 3 | रक्तपेढी सहाय्यक (प्रस्ताव विभाग) | 3 | रु. 16,000/- | 1. उमेदवार मान्यता प्राप्त विद्यापीठाचा रसायनशास्त्र (Chemistry) / सुक्ष्मजीवशास्त्र (Microbiology) / जीवरसायनशास्त्र (Biochemistry)/ जैविकतंत्रज्ञान (Biotechnology) या मुख्य विषयासह विज्ञान शाखेतील पदवी (Degree in B.Sc.) उत्तीर्ण असावा.<br>2. उमेदवारांना संगणकाचे ज्ञान असणे आवश्यक आहे. त्याने/तिने डी.ओ.ई.ए.सी.सी सोसायटीचे (सी.सी.सी) किंवा (ओ स्तर) किंवा (ए स्तर) किंवा (बी स्तर) किंवा (सी स्तर) स्तरावरील प्रमाणपत्र किंवा महाराष्ट्र राज्य आणि तांत्रिकी शिक्षण मंडळाचे एम.एस.सी.आय.टी किंवा जी.ई.सी.टी. प्रमाणपत्र धारण करणे आवश्यक आहे.<br>3. उमेदवारास खात्यामार्फत घेण्यात येणारी व्यवसाय चाचणी उत्तीर्ण होणे आवश्यक आहे.<br>4. उमेदवार माध्यमिक शांलात प्रमाणपत्र परीक्षा किंवा उच्चतम परीक्षेत किमान 50 गुणांची प्रश्नपत्रिका असलेला मराठी विषय (उच्चस्तर किंवा निम्नस्तर) घेऊन उत्तीर्ण असणे आवश्यक आहे |
| 4 | कंत्राटी बहुउद्देशिय कामगार (प्रस्ताव विभाग) | 1 | रु. 18,000/- | 1. उमेदवार मान्यताप्राप्त मंडळाची उच्च माध्यमिक (HSC) शालांत प्रमाणपत्र परीक्षा **प्रथम प्रयत्नात उत्तीर्ण** असावा.<br>2. मराठी भाषेचे ज्ञान असणे आवश्यक. |

| अनु. क्र. | पदाचे नाव | एकूण पदे | ठोक मानधन (प्रति माह) | शैक्षणिक अर्हता |
|---|---|---|---|---|
| 5 | कंत्राटी कामगार (प्रस्ताव विभाग) | 1 | रु. 18,000/- | 1. उमेदवार मान्यताप्राप्त मंडळाची माध्यमिक (SSC) शालांत प्रमाणपत्र परीक्षा **प्रथम प्रयत्नात उत्तीर्ण** असावा.<br>2. मराठी भाषेचे ज्ञान असणे आवश्यक |
| 6 | समाज विकास अधिकारी (प्रस्ताव विभाग) | 9 | रु. 30,000/- | 1.उमेदवार मान्यताप्राप्त विद्यापीठाची वैद्यकीय व मानसोपचार समाज कार्य (Medical and Psychiatric Social Work) विषयात पूर्णवेळ पदव्युत्तर पदवी धारक असावा.<br>अथवा<br>उमेदवार मान्यताप्राप्त विद्यापीठाची समाज कार्यातील (सामान्य) ( Master in Social Work in Generic ) विषयात पूर्ण वेळ पदव्युत्तर पदवी धारक असावा.<br>अथवा<br>उमेदवार मान्यताप्राप्त विद्यापीठाची समाज कार्यातील दूरस्थ अभ्यासक्रमादवारे अर्धवेळ पदव्युत्त पदवीधारक (एमएसडब्ल्यू) असावा.<br>2. उमेदवाराला एक वर्षाचा शासकीय किंवा अशासकीय क्षेत्रातील समाज कार्याचा अनुभव असावा.<br>3. उमेदवार महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण<br>4. मंडळाची शालांत परीक्षा वा तत्सम परीक्षा किमान १०० गुणांची प्रश्नपत्रिका असलेला मराठी विषय घेऊन उत्तीर्ण झालेला असावा.<br>5. उमेदवारांना संगणकाचे ज्ञान अवगत करणे आवश्यक आहे. त्याने/तिने (डी.ओ.ई.ए.सी.सी.) सोसायटीचे (सी.सी.सी.) किंवा (ओ स्तर) किंवा (ए स्तर ) किंवा (बी स्तर) किंवा (सी स्तर ) स्तरावरील प्रमाणपत्र किंवा महाराष्ट्र राज्य आणि तांत्रिकी शिक्षण मंडळाचे एम.एस.सी.आय.टी. किंवा जी.ई.सी.टी. चे प्रमाणपत्र धारण करणे आवश्यक आहे अथवा २ वर्षात उत्तीर्ण होणे आवश्यक आहे. |
| 7 | नेत्रशल्यचिकित्सा तज्ञ (प्रस्ताव विभाग) | 1 | रु. 25,000/- | 1. उमेदवार हा शालांत (एस.एस.सी) परीक्षेसह ऑप्टोमेट्रीमधील 3 वर्षाचा पदविधारक असावा.<br>किंवा<br>2. उच्च माध्यमिक शालांत (एच.एस.सी) परीक्षेसह बी.एस्सी ऑप्टोमेट्रीमधील पदवीधारक असावा पदवीधारक उमेदवारांस प्राधान्य देण्यात येईल.<br>3. उमेदवार महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाची शालांत परीक्षा वा तत्सम परीक्षा किमान 50 गुणांची प्रश्नपत्रिका असलेला मराठी विषय घेऊन उत्तीर्ण झालेला असावा.<br>4. उमेदवारांना संगणकाचे ज्ञान असणे आवश्यक आहे. त्याने/तिने |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | | डी.ओ.ई.ए.सी.सी सोसायटीचे (सी.सी.सी) किंवा (ओ स्तर) किंवा (ए स्तर) किंवा (बी स्तर) किंवा (सी स्तर) स्तरावरील प्रमाणपत्र किंवा महाराष्ट्र राज्य आणि तांत्रिकी शिक्षण मंडळाचे एम.एस.सी.आय.टी किंवा जी.ई.सी.टी. प्रमाणपत्र धारण करणे आवश्यक आहे. |
| 8 | आहारतज्ञ (प्रस्ताव विभाग) | 1 | रु. 25,000/- | 1. उमेदवाराने मान्यताप्राप्त विद्यापीठातून विज्ञान शाखेतील होमसायन्स/ न्युट्रीशन/डायटेटिक्स विषय घेऊन पदवी उत्तीर्ण होणे आवश्यक आहे आणि त्याने मान्यताप्राप्त विद्यापीठाची / संस्थेची डायटेटिक्स/ न्युट्रीशन मधील पदव्युत्तर पदवी (एम.एस.सी.) परीक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक आहे.<br>किंवा<br>2. उमेदवाराने मान्यताप्राप्त विद्यापीठातून विज्ञान शाखेतील होमसायन्स/न्युट्रीशन/डायटेटिक्स विषय घेऊन पदवी उत्तीर्ण होणे आवश्यक आहे आणि त्याने मान्यताप्राप्त विद्यापीठाची / संस्थेची डायटेटिक्स / न्युट्रीशन मधील पदव्युत्तर पदविका (पी.जी.डी.) उत्तीर्ण असणे आवश्यक आहे. (पदवी, पदव्युत्तर पदवी / पदव्युत्तर पदविका दुरस्थ शिक्षणाव्दारे प्राप्त केलेली नसावी.) उमेदवाराकडे किमान 100 खाटा असणा-या नामांकित रुग्णालयातील आहार नियोजनाचा 3 वर्षाचा अनुभव असावा. बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या रुग्णालयात आहारतज्ञ म्हणून प्रशिक्षण घेतलेल्या पूर्ण केलेल्या उमेदवारांचा सदर प्रशिक्षण कालावधीसुध्दा अनुभव म्हणून ग्राहय धरुन त्यांचा निवडीसाठी प्राधान्याने विचार केला जाईल.<br>3. नोंदणीकृत आहारतज्ञांना प्राधान्य दिले जाईल.<br>4. उमेदवार माध्यमिक शालांत प्रमाणपत्र किंवा तत्सम किंवा उच्चत्तम परीक्षा (किमान 50 गुणांची प्रश्नपत्रिका असलेला ) मराठी विषय (उच्चस्तर /निम्नस्तर ) घेऊन उत्तीर्ण झालेला असावा.<br>5. उमेदवारांना संगणकाचे ज्ञान अवगत करणे आवश्यक आहे. त्याने/तिने (डी.ओ.ई.ए.सी.सी.) सोसायटीचे (सी.सी.सी.) किंवा (ओ स्तर) किंवा (ए स्तर ) किंवा (बी स्तर) किंवा (सी स्तर ) स्तरावरील प्रमाणपत्र किंवा महाराष्ट्र राज्य आणि तांत्रिकी शिक्षण मंडळाचे एम.एस.सी.आय.टी. किंवा जी.ई.सी.टी. चे प्रमाणपत्र धारण करणे आवश्यक आहे. |

| अनु. क्र. | पदाचे नाव | एकूण पदे | ठोक मानधन (प्रति माह) | शैक्षणिक अर्हता |
|---|---|---|---|---|
| 9 | वाकपचार व श्रवणतंत्रज्ञ (प्रस्ताव विभाग)<br><br>(अर्धवेळ वेळ)<br><br>(पुर्णवेळ) | <br><br><br>1<br><br>1 | <br><br><br>रू.25,000/-<br><br>रू.50,000/- | 1. उमेदवार मान्यता प्राप्त विद्यापीठाची ऑडीओलॉजी आणि स्पीच थेरपी (Audiology & Speech Therapy) ही पदवी धारण करणारा असावा.<br>2. उमेदवाराने वाक् श्रवण उपचार किंवा कर्णबधीर क्लिनिक मध्ये काम केल्याचा किमान एक वर्षाचा अनुभव असावा.<br>3. उमेदवार माध्यमिक शालांन्त प्रमाणपत्र परीक्षा किंवा तत्सम किंवा उच्चतम परीक्षेत किमान 50 गुणांची मराठी प्रश्नपत्रिका असलेला मराठी विषय घेऊन उत्तीर्ण असणे आवश्यक आहे.<br>4. उमेदवार डि.ओ.ई.ए.सी.सी. सोसायटीचे सी.सी.सी. किंवा ओ स्तर किंवा ए स्तर किंवा बी स्तर किंवा सी स्तर स्तरावरील प्रमाणपत्र किंवा महाराष्ट्र राज्य उच्च आणि तांत्रिकी शिक्षण मंडळाचे एम.एस.सी.आय.टी. किंवा जी.ई. सी.टी.चे प्रमाणपत्र धारक असावा. |
| 10 | प्रयोगशाळा तंत्रज्ञ (प्रस्ताव विभाग) | 47 | रू.20,000/- | 1. उमेदवार मान्यताप्राप्त विद्यापीठाची विज्ञान शाखेतील (Degree in B. Sc.) पदवी धारण करणारा असावा आणि मान्यताप्राप्त विद्यापीठाची (MSBT) ची/ डी.एम.एल.टी. (D.M.L.T.) पदविका उत्तीर्ण असावा. (B.Sc.+ D.M.L.T.)<br>किंवा<br>2. उमेदवाराने १२ वी नंतर महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ यांचेकडील निम वैद्यकिय तंत्रज्ञान या शाखेतील लॅबोरेटरी मेडीसीन या विषयातील (Bachelor of Paramedical Technology in Laboratory Medicine) पदवी धारण करणारा असावा.<br>3. उमेदवार महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाची शालांत परीक्षा वा तत्सम परीक्षा किमान 50 गुणांची प्रश्नपत्रिका असलेला मराठी विषय घेऊन उत्तीर्ण झालेला असावा.<br>4. उमेदवारांना संगणकाचे ज्ञान अवगत करणे आवश्यक आहे. त्याने/तिने डी.ओ.ई.ए.सी.सी. सोसायटीचे (सी.सी.सी.) किंवा (ओ स्तर) किंवा (ए स्तर ) किंवा (बी स्तर) किंवा (सी स्तर ) स्तरावरील प्रमाणपत्र किंवा महाराष्ट्र राज्य आणि तांत्रिकी शिक्षण मंडळाचे एम.एस.सी.आय.टी. किंवा जी.ई.सी.टी. चे प्रमाणपत्र धारण करणे आवश्यक आहे अथवा 2 वर्षात उत्तीर्ण होणे आवश्यक आहे. |

| अनु. क्र. | पदाचे नाव | एकूण पदे | ठोक मानधन (प्रति माह) | शैक्षणिक अर्हता |
|---|---|---|---|---|
| 11 | प्रयोगशाळा सहाय्यक (प्रस्ताव विभाग) | 32 | रु.16,000/- | 1. उमेदवार मान्यता प्राप्त विद्यापीठाचा रसायनशास्त्र (Chemistry)सुक्ष्मजीवशास्त्र(Microbiology)/जीवरसायनशास्त्र (Biochemistry)/ जैविकतंत्रज्ञान (Biotechnology) या मुख्य विषयासह विज्ञान शाखेतील पदवी (Degree in B.Sc.) उत्तीर्ण असावा.<br>2. उमेदवारांना संगणकाचे ज्ञान असणे आवश्यक आहे. त्याने/तिने डी.ओ.ई.ए.सी.सी सोसायटीचे (सी.सी.सी) किंवा (ओ स्तर) किंवा (ए स्तर) किंवा (बी स्तर) किंवा (सी स्तर) स्तरावरील प्रमाणपत्र किंवा महाराष्ट्र राज्य आणि तांत्रिकी शिक्षण मंडळाचे एम.एस.सी.आय.टी किंवा जी.ई.सी.टी. प्रमाणपत्र धारण करणे आवश्यक आहे.<br>3. उमेदवारास खात्यामार्फत घेण्यात येणारी व्यवसाय चाचणी उत्तीर्ण होणे आवश्यक आहे.<br>4. उमेदवार माध्यमिक शांलात प्रमाणपत्र परीक्षा किंवा उच्चतम परीक्षेत किमान 50 गुणांची प्रश्नपत्रिका असलेला मराठी विषय (उच्चस्तर किंवा निम्नस्तर) घेऊन उत्तीर्ण असणे आवश्यक आहे. |
| 12 | क्ष-किरण -तंत्रज्ञ (x-Ray Technician) (प्रस्ताव विभाग) | 19 | रु. 20,000/- | 1. उमेदवार 12 वी नंतर महाराष्ट् आरोग्य विज्ञान विद्यापीठामार्फत चालविला जाणारा क्ष-किरण विषयातील बी.पी.एम.टी. (Bachelor of Paramedical Technology in Radiology) हा पूर्णवेळ 3 वर्षाचा पदवी अभ्यासक्रम उत्तीर्ण झालेला असावा व त्याने 6 महिन्यांची इंटरशीप पुर्ण केलेली असावी. (प्रथम प्राधान्य)<br>किंवा<br>2. उमेदवार मान्यताप्राप्त विद्यापीठाची विज्ञान शाखेची पदवी परीक्षा उत्तीर्ण झालेला असावा. त्याचबरोबर मान्यताप्राप्त संस्थेकडून/विद्यापीठातून रेडीओग्रॉफी ही पदविका (Diploma in Radiography) उत्तीर्ण झालेला असावा व डायग्नोस्टिक सेंटर/रुग्णालय येथील क्ष-किरण विषयक कामाचा 01 वर्षाचा अनुभव असावा. (व्दितीय प्राधान्य)<br>किंवा<br>3. उमेदवार हा विज्ञान शाखेतील 12 वी किंवा 12 वी (MCVC) नंतर मान्यताप्राप्त संस्थेकडून/विद्यापीठातून रेडीओग्रॉफी ही पदविका (Diploma in Radiography) उत्तीर्ण झालेला असावा व डायग्नोस्टिक सेंटर/रुग्णालय येथील क्ष-किरण विषयक कामाचा 02 वर्षाचा अनुभव असावा. (तृतीय प्राधान्य)<br>4. उमेदवारास खात्यामार्फत घेण्यात येणारी व्यवसाय चाचणी (Trade Test) परिक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक आहे. |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | | ५. उमेदवार महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाची शालांत परीक्षा वा तत्सम परीक्षा किमान 50 गुणांची प्रश्नपत्रिका असलेला मराठी विषय घेऊन उत्तीर्ण झालेला असावा.<br>6. उमेदवारांना संगणकाचे ज्ञान अवगत करणे आवश्यक आहे. त्याने/तिने (डी.ओ.ई.,ए.सी.सी.) सोसायटीचे (सी.सी.सी.) किंवा (ओ स्तर) किंवा (ए स्तर) किंवा (बी स्तर) किंवा (सी स्तर) स्तरावरील प्रमाणपत्र किंवा महाराष्ट राज्य आणि तांत्रिकी शिक्षण मंडळाचे एम. एस. सी. आय. टी. किंवा जी.ई.सी.टी.चे प्रमाणपत्र धारण करणे आवश्यक आहे. |
| 13 | क्ष-किरण - सहाय्यक (X-ray Assistant) (प्रस्ताव विभाग) | 30 | रु. 16,000/- | 1. उमेदवार 12 वी नंतर महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठामार्फत चालविला जाणारा क्ष- किरण विषयातील बी.पी.एम.टी. (Bachelor in Paramedical Technology in Radiography) 3 वर्षांचा पूर्णवेळ पदवी अभ्यासक्रम उत्तीर्ण झालेला असावा व त्याने सहा महिन्यांची इंटर्नशीप पूर्ण केलेली असावी.<br>2. उमेदवारांना संगणकाचे ज्ञान अवगत करणे आवश्यक आहे. त्याने/तिने (डी.ओ.ई.,ए.सी.सी.) सोसायटीचे (सी.सी.सी.) किंवा (ओ स्तर) किंवा (ए स्तर) किंवा (बी स्तर) किंवा (सी स्तर) स्तरावरील प्रमाणपत्र किंवा महाराष्ट राज्य आणि तांत्रिकी शिक्षण मंडळाचे एम. एस. सी. आय. टी. किंवा जी.ई.सी.टी.चे प्रमाणपत्र धारण करणे आवश्यक आहे.<br>3. उमेदवारास खात्यामार्फत घेण्यात येणारी व्यवसाय चाचणी उत्तीर्ण होणे आवश्यक आहे.<br>4. उमेदवार माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा किंवा तत्सम किंवा उच्चतम परीक्षा किमान 50 गुणांची प्रश्नपत्रिका असलेला मराठी विषय घेऊन उत्तीर्ण झालेला असावा. |
| 14 | संजिवन तंत्रज्ञ (प्रस्ताव विभाग) | 4 | रु.40,000/- | 1. उमेदवार मान्यताप्राप्त विद्यापीठाची Bachelor of Paramedical Technology (**BPMT) / MUHS Perfusion Technician अथवा B.Sc.(Paramedical Technology) Perfusion Technician** पदवी धारक असावा.<br>2. उमेदवाराला किमान एक वर्षाचा संजीवन तंत्रज्ञ म्हणून अनुभव असावा<br>3. उमेदवार महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाची शालांत परीक्षा वा तत्सम परीक्षा किमान 50 गुणांची प्रश्नपत्रिका असलेला मराठी विषय घेऊन उत्तीर्ण झालेला असावा.<br>४. उमेदवारांना संगणकाचे ज्ञान असणे आवश्यक आहे. त्याने/तिने डी.ओ.ई.ए.सी.सी सोसायटीचे (सी.सी.सी) किंवा (ओ स्तर) किंवा (ए स्तर) किंवा (बी स्तर) किंवा (सी स्तर) स्तरावरील प्रमाणपत्र किंवा महाराष्ट्र राज्य आणि तांत्रिकी शिक्षण मंडळाचे एम.एस.सी.आय.टी किंवा जी.ई.सी.टी.चे प्रमाणपत्र धारण करणे आवश्यक आहे. |

| अनु. क्र. | पदाचे नाव | एकूण पदे | ठोक मानधन (प्रति माह) | शैक्षणिक अर्हता |
|---|---|---|---|---|
| 15 | डायलिसिस तंत्रज्ञ (प्रस्ताव विभाग) | 12 | रु. 20,000/- | 1. 12th std. passed with Dialysis Technician Course<br>किंवा<br>2. GNM Nursing<br>किंवा<br>3. B.Sc. Nursing with Dialysis Technician Course<br>4. उमेदवारांना संगणकाचे ज्ञान असणे आवश्यक आहे. त्याने/तिने डी.ओ.ई.ए.सी.सी सोसायटीचे (सी.सी.सी) किंवा (ओ स्तर) किंवा (ए स्तर) किंवा (बी स्तर) किंवा (सी स्तर) स्तरावरील प्रमाणपत्र किंवा महाराष्ट्र राज्य आणि तांत्रिकी शिक्षण मंडळाचे एम.एस.सी.आय.टी किंवा जी.ई.सी.टी. प्रमाणपत्र धारण करणे आवश्यक आहे.<br>5. उमेदवार माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा किंवा तत्सम किंवा उच्चतम परीक्षा (50 गुणांची प्रश्नपत्रिका असलेली) मराठी विषय (उच्चस्तर किंवा निम्नस्तर) घेऊन उत्तीर्ण असावा. |
| 16 | औषधनिर्माता (Pharmacist) (प्रस्ताव विभाग) | 8 | रु. 20,000/- | 1. उमेदवाराकडे राज्य शासनाच्या तंत्रशिक्षण मंडळाची फार्मसीमधील पदविका किंवा मान्यताप्राप्त विद्यापीठाची फार्मसी मधील पदवी असणे आवश्यक आहे.<br>2. उमेदवार महाराष्ट्र राज्य फार्मसी कौन्सिलकडे नोंदणीकृत असावा.<br>3. उमेदवारास महानगरपालिकेच्या खात्यामार्फत घेण्यात येणारी व्यवसाय चाचणी (Trade Test) परिक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक आहे.<br>4. उमेदवार माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा किंवा तत्सम किंवा उच्चतम परीक्षा (50 गुणांची प्रश्नपत्रिका असलेली) मराठी विषय (उच्चस्तर किंवा निम्नस्तर) घेऊन उत्तीर्ण असावा.<br>5. उमेदवाराकडे संगणकांचे 'डी.ओ.ई.ए.सी.सी.' सोसायटीचे 'सी.सी.सी.' किंवा 'ओ स्तर' किंवा 'ए' स्तर किंवा 'बी' स्तर किंवा 'सी' स्तरावरील प्रमाणपत्र किंवा महाराष्ट्र राज्य उच्च आणि तांत्रीकी शिक्षण मंडळाचे 'एम.एस.सी.आय.टी' किंवा 'जी.ई.सी.टी' चे प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे. |

| अनु. क्र. | पदाचे नाव | एकूण पदे | ठोक मानधन (प्रति माह) | शैक्षणिक अर्हता |
|---|---|---|---|---|
| 17 | ई.सी.जी. तंत्रज्ञ (प्रस्ताव विभाग) | 2 | रु.18,000/- | **1.** उमेदवार 12 वी नंतर महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठामार्फत चालविला जाणारा कार्डिओ-टेक्नोलॉजी (Cardio-Technology) विषयातील बी.पी.एम.टी. (Bachelor in paramedical technology in Cardio Technology) 3 $^1/_2$ वर्षाचा पूर्णवेळ पदवी अभ्यासक्रम उत्तीर्ण झालेला असावा.<br>**किंवा**<br>2. उमेदवार मान्यता प्राप्त विद्यापिठाची विज्ञान शाखेची पदार्थ विज्ञान (B.SC. Physics) पदवी परीक्षा उत्तीण असावा व त्यास ई.सी.जी.मधील कामाचा 6 महिन्यांचा अनुभव असावा.<br>3. उमेदवारास महानगरपालिकेच्या खात्यामार्फत घेण्यात येणारी व्यवसाय चाचणी (Trade Test) परिक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक आहे.<br>4. उमेदवाराकडे संगणकांचे 'डी.ओ.ई.ए.सी.सी.' सोसायटीचे 'सी.सी.सी.' किंवा 'ओ स्तर' किंवा 'ए' स्तर किंवा 'बी' स्तर किंवा 'सी' स्तरावरील प्रमाणपत्र किंवा महाराष्ट्र राज्य उच्च आणि तांत्रीकी शिक्षण मंडळाचे 'एम.एस.सी.आय.टी' किंवा 'जी.ई.सी.टी' चे प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे.<br>5. उमेदवार माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा किंवा तत्सम किंवा उच्चतम परीक्षा (50 गुणांची प्रश्नपत्रिका असलेली) मराठी विषय (उच्चस्तर किंवा निम्नस्तर) घेऊन उत्तीर्ण असावा. |
| 18 | कार्यकारी सहाय्यक (वरिष्ठ आस्थापना) | 47 | रु.22,000/- | 1. i) उमेदवार मान्यताप्राप्त मंडळाची माध्यमिक (SSC) शालांत प्रमाणपत्र परीक्षा उत्तीर्ण असावा.<br>आणि<br>ii) उमेदवार मान्यताप्राप्त विद्यापीठाचा वाणिज्य, विज्ञान, कला, विधि किंवा तत्सम शाखांचा पदवीधर असावा<br>2. उमेदवार माध्यमिक शालांत प्रमाणपत्र वा तत्सम किंवा उच्च परीक्षा 100 गुणांचे मराठी व 100 गुणांचे इंग्रजी विषय घेऊन उत्तीर्ण झालेला असावा.<br>3. उमेदवाराने शासनाची इंग्रजी व मराठी टंकलेखनाची प्रत्येकी किमान 30 शब्द प्रति मिनिट वेगाची परीक्षा उत्तीर्ण केल्याचे प्रमाणपत्र असावे<br>4. i) महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्र शिक्षण मंडळ, मुंबई यांचेकडील अधिकृत MS-CIT किंवा DOEEACC सोसायटी अधिकृत CCC किंवा O/A/B/C स्तर पैकी कोणतीही एक परिक्षा उत्तीर्ण झाल्याचे प्रमाणपत्र.<br>ii) उमेदवाराला संगणकातील ऑपरेटींग सिस्टम, वर्ड प्रोसेसिंग, स्प्रेडशिट, प्रेझेनटेशन, डेटाबेस सॉफ्टवेअर, ई-मेल आणि इंटरनेट इत्यादीविषयी उत्तम ज्ञान असावे. |

| अनु. क्र. | पदाचे नाव | एकूण पदे | ठोक मानधन (प्रति माह) | शैक्षणिक अर्हता |
|---|---|---|---|---|
| 19 | दूरध्वनी चालक (वरिष्ठ आस्थापना) | 11 | रु.14,000/- | 1. उमेदवार मान्यताप्राप्त मंडळाची माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा किंवा तत्सम परीक्षा उत्तीर्ण असावा.<br>आणि<br>2. शासन मान्यता प्राप्त संस्थे मार्फत किमान 6 महिने इतका दूरध्वनीचालक म्हणून अभ्यासक्रम केलेला असावा.<br>3. उमेदवार माध्यमिक शालांत प्रमाणपत्र वा तत्सम किंवा उच्च परीक्षा 100 गुणांचे मराठी व 100 गुणांचे इंग्रजी विषय घेऊन उत्तीर्ण झालेला असावा.<br>टिप -उमेदवाराला मराठी, हिन्दीं, इंग्रजी भाषा किमान लिहिता वाचता येणे आवश्यक असावे |
| 20 | अर्धवेळ नोंदणी सहाय्यक (वरिष्ठ आस्थापना) | 12 | रु.7,000/- | 1. उमेदवार मान्यताप्राप्त मंडळाची माध्यमिक (SSC) शालांत प्रमाणपत्र परीक्षा उत्तीर्ण असावा.<br>2. उमेदवार माध्यमिक शालांत प्रमाणपत्र वा तत्सम किंवा उच्च परीक्षा 100 गुणांचे मराठी व 100 गुणांचे इंग्रजी विषय घेऊन उत्तीर्ण झालेला असावा.<br>3. उमेदवाराला मराठी, हिन्दीं, इंग्रजी भाषा किमान लिहिता वाचता येणे आवश्यक असावे<br>टिप - रुग्णालयाच्या वैद्यकीय अभिलेख विभागात काम केल्याचा अनुभव असलेल्या उमेदवारांना प्रथम प्राधान्य देण्यात येईल. |
| 21 | नोंदणी सहाय्यक (वरिष्ठ आस्थापना) | 8 | रु.14,000/- | 1. i) उमेदवार मान्यताप्राप्त मंडळाची माध्यमिक (SSC) शालांत प्रमाणपत्र परीक्षा उत्तीर्ण असावा.<br>आणि<br>ii) उमेदवार मान्यताप्राप्त विद्यापीठाचा वाणिज्य, विज्ञान, कला, विधि किंवा तत्सम शाखांचा पदवीधर असावा<br>2. उमेदवार माध्यमिक शालांत प्रमाणपत्र वा तत्सम किंवा उच्च परीक्षा 100 गुणांचे मराठी व 100 गुणांचे इंग्रजी विषय घेऊन उत्तीर्ण झालेला असावा.<br>3. i) महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्र शिक्षण मंडळ, मुंबई यांचेकडील अधिकृत MS-CIT किंवा DOEEACC सोसायटी अधिकृत CCC किंवा O/A/B/C स्तर पैकी कोणतीही एक परिक्षा उत्तीर्ण झाल्याचे प्रमाणपत्र.<br>ii) उमेदवाराला संगणकातील ऑपरेंटींग सिस्टम, वर्ड प्रोसेसिंग, स्प्रेडशिट, प्रेझेनटेशन, डेटाबेस सॉफ्टेवेअर, ई-मेल आणि इंटरनेट इत्यादीविषयी उत्तम ज्ञान असावे. |

तसेच वरील अनु क्र. 1 ते 21 मधील उमेदवारांना खालील अर्हता असणे गरजेचे आहे.

1) उपरोक्त तक्त्यातील संवर्गापुढील नमुद सबंधीत संवर्गाच्या शैक्षणिक अर्हतेनुसार उमेदवार माध्यमिक शालांत प्रमाणपत्र किंवा तत्सम किंवा उच्चतम परीक्षेत किमान 50 गुणांची / 100 गुणांची प्रश्नपत्रिका असलेली मराठी विषय घेऊन उत्तीर्ण असणे आवश्यक आहे.

2) उमेदवार 'डीओईएसीसी' सोसायटीचे 'सीसीसी' किंवा 'ओ स्तर' किंवा 'ए स्तर' किंवा 'बी स्तर' किंवा 'सी स्तर' स्तरावरील प्रमाणपत्र किंवा महाराष्ट्र राज्य उच्च आणि तांत्रिक शिक्षण मंडळाचे 'एम.एस.सी.आय.टी.' किंवा 'जीईसीटीचे' प्रमाणपत्र धारक असावा किंवा सदर प्रमाणपत्र सादर करण्यास सुट देण्याकरीता उमेदवाराने शासनाने वेळोवेळी संगणक हाताळणी/वापराबाबत मान्यता दिलेला अभ्यासक्रम पूर्ण केलेला असावा.

**वयोमर्यादा**: उमेदवाराचे वय 18 वर्षापेक्षा कमी व 38 वर्षापेक्षा जास्त असता कामा नये.

**निवडीचे निकष व कार्यपध्दती:**

1. सदर पदाची विहित केलेली शैक्षणिक अर्हता, मुलाखत, अनुभव व व्यवसाय चाचणी परिक्षेव्दारे प्राप्त झालेल्या गुणांच्या आधारे उमेदवारांची गुणवत्ता यादी तयार करण्यात येईल. गुणवत्ता यादीतील उमेदवारामधून निवड यादी तयार करण्यात येईल.
2. मुलाखतीचे ठिकाण, दिनांक व वेळ : रा.ए.स्मारक रुग्णालयाच्या स्थानिक फलकावर प्रदर्शित करण्यात येईल.
3. अर्ज करण्याचा कालावधी :
   दि. 05.08.2025 ते 14.08.2025
4. अर्जाचे शुल्क :
   रुपये 790/- + 18% जीएसटी रु. 143/- = एकूण रु. 933/-
   सदर शुल्क हे ना परतावा राहील व ते कोणत्याही परिस्थितीत परत केले जाणार नाही.
5. शुल्क भरण्याचा कालावधी : दि. 05.08.2025 ते 14.08.2025

**सर्वसाधारण अटी:**

- उमेदवाराचा भ्रमणध्वनी क्रमांक, ई-मेल आयडी अणि पत्रव्यवहाराचा पत्ता (पिनकोड सह) सुस्पष्ट व पुर्ण असावा.
- कंत्राटी कर्मचा-यांना देण्यात येणारे ठोक मानधना व्यतिरिक्त कोणत्याही प्रकारचा महागाई भत्ता, घरभाडे भत्ता इत्यादी अनुज्ञेय असणार नाही.
- महिला उमेदवारांनी विवाहनोंदणी प्रमाणपत्र, नावात बदल झाल्याचे राजपत्र सादर करावे. तसेच ते नसल्यास विवाहित महिला उमेदवार विवाहापूर्वीच्या नावाने अर्ज करु शकतात.
- उमेदवाराला कोणत्याही न्यायालयाने नैतिक अध:पतन किंवा फौजदारी स्वरुपाच्या खटल्यात शिक्षा दिली असल्यास, तसेच उमेदवाराविरुध्द पोलिस चौकशी / न्यायालयीन प्रकरण प्रलंबित असल्यास/शिक्षा झालेली असल्यास उमेदवाराने त्याबाबत माहिती देणे आवश्यक आहे.
- त्यांच्या तात्पुरत्या स्वरुपातील सेवेच्या कालावधी एका वेळेस निव्वळ **89** दिवसांचा असेल.
- उमेदवारास नियुक्त केलेल्या विभागातील सत्रांनुसार साप्ताहिक रजा व एका कॅलेंडर वर्षाला 15 नैमित्तिक रजा अनुज्ञेय असेल, त्या व्यतिरिक्त इतर कोणतीही रजा अनुज्ञेय नाही.
- तात्पुरत्या स्वरूपातील कालावधीत त्यांचे काम समाधानकारक न आढळल्यास कोणतीही पूर्व सुचना न देता समाप्त करण्याचे अधिकार मा.अधिष्ठाता, रा.ए.स्मारक रुग्णालय यांच्याकडे राहील.
- त्यांची नेमणूक करार पध्दतीची असल्यामुळे त्यांना कोणत्याही न्यायालयात जाता येणार नाही.
- नियुक्तीचे वेळी उमेदवाराकडुन रु. 500/- बॉंड पेपर वर करारनामा करुन घेण्यात येईल.

- तात्पुरत्या स्वरूपातील नियुक्त उमेदवार दररोज नियमाने त्यांच्या कर्तव्याच्या वेळेनुसार बायोमॅट्रिक करतील अन्यथा त्यांना गैरहजर धरण्यात येईल. त्यांची विना परवानगी गैरहजेरी विना वेतनी गैरहजेरी (LWP) करण्यात येईल.
- सदर तात्पुरत्या स्वरूपातील तत्त्वावरील पदधारकाच्या नियुक्ती कालावधीमध्ये उमेदवाराने शिस्तभंग केल्याचे निदर्शनास आल्यास त्यांची नियुक्ती कोणतीही पूर्वसूचना न देता तात्काळ रदद करण्यांत येईल.
- कोणत्याही कारणास्तव निवड झालेल्या उमेदवारास पदाचा राजीनामा द्यावयाचा असल्यास त्याने 15 दिवसांची पूर्वसूचना देणे बंधनकारक आहे.
- नियुक्त झालेल्या उमेदवारास मनपामध्ये कायमस्वरुपी सेवेसाठी कोणताही हक्क सांगता येणार नाही तसेच त्यांना नियमित सेवेचे कोणतेही फायदे अनुज्ञेय असणार नाहीत.
- रा.ए.स्मारक रुग्णालय, परेल, मुंबई – 12 येथे नियुक्त केलेल्या व विभागप्रमुखांनी नेमणूक केलेल्या कोणत्याही विभागात तीन पाळीत काम करावे लागेल.
- उमेदवारास मुलाखतीसाठी स्वखर्चाने उपस्थित रहावे लागेल.
- निवड प्रकिया सुरु झाल्यानंतर किंवा नियुक्तीनंतर कोणत्याही क्षणी उमेदवाराने चुकीची माहिती/प्रमाणपत्रे/कागदपत्रे सादर केल्यास किंवा कोणतीही माहिती दडवून ठेवल्याचे निदर्शनास आल्यास त्याची उमेदवारी रददबातल करण्यांत येईल. तसेच नियुक्ती झालेली असल्यास कोणतीही पूर्वसूचना न देता त्याची नियुक्ती समाप्त करण्यांत येईल.
- प्रशासकीय किंवा अन्य कारणास्तव निवडप्रकिया कोणत्याही वेळेस कोणत्याही टप्प्यावर थांबविण्याचे अधिकार मा.अधिष्ठाता, रा.ए.स्मारक रुग्णालय यांना आहेत.

**वैद्यकीय व निम वैद्यकीय संवर्गासाठी आवश्यक कागदपत्रांची यादीः**

1. **उमेदवाराचे पूर्ण भरलेले अर्जाचे प्रत (Application Form) व वैयक्तिक माहितीपत्र (Bio-Data)**
2. **शैक्षणिक प्रमाणपत्रे (Educational Certificates)**
    - 10वी व 12वीचे गुणपत्रक व प्रमाणपत्र
    - संबंधित पदाच्या अर्हतेनुसार आवश्यक कागदपत्रे पदवी / पदविका / पदव्युत्तर / फेलोशिप /MSCIT/ टंकलेखन प्रमाणपत्र इ.
3. **नोंदणी प्रमाणपत्र (Registration Certificate)**
    - संबंधित परिषदेचे नोंदणी प्रमाणपत्र उदा.महाराष्ट्र मेडिकल कौन्सिल / फार्मसी कौन्सिल (संबधीत पदाच्या अर्हतेतील आवश्यकतेनूसार)
4. **अनुभव प्रमाणपत्रे (Experience Certificates)**
5. आधार कार्ड
6. पॅन कार्ड
7. अधिवास प्रमाणपत्र (Domacile Certificate )
8. **पत्त्याचा पुरावा (Address Proof) – Driving Licience, Electricity Bill, Voting Id, Ration Card.**
9. **सर्व कागदपत्रांच्या छायांकीत प्रती स्वंयसांक्षाकीत करुन जोडण्यात यावे.**

**टीपः** मुलाखतीसाठी उपस्थित राहताना सर्व कागदपत्रांची पडताळणकरीता **मूळ कागदपत्रे** बरोबर घेऊन येणे अनिवार्य आहे.

**<u>विशेष सुचना : -</u>**

अ) यापूर्वी संबंधित कार्यालयात व अन्य ठिकाणी सादर केलेले/प्राप्त झालेले अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत. तसेच बृहन्मुंबई महानगरपालिकेने कोणत्याही व्यक्तीला व इतर दुस-या संस्थेला अर्ज विकणे, स्विकारणे इत्यादींचा अधिकार दिलेला नाही याची कृपया नोंद घ्यावी.

ब) अर्जाचे विहित मुल्य भरुन त्याची पावती जोडल्याशिवाय अर्ज ग्राहय धरण्यात येणार नाहीत.

क) टपालाने अथवा ऑनलाईन पदधतीने आलेले अर्ज विचारात घेतले जाणार नाही.

ड) **अपूर्ण भरलेले व पदासाठी आवश्यक शैक्षणिक पात्रतेबाबतच्या कागदपत्रांच्या प्रती न जोडलेले तसेच, उपरोक्त नमुद आवश्यक कागदपत्रे (अनु क्र.1 ते अनू क्र.8) जोडण्यात न आलेले अर्ज ग्राहय धरण्यात येणार नाहीत.**

सोबत : अर्जाचा नमुना

**सही/-दि.05.08.2025**
**अधिष्ठाता**
**रा.ए.स्मारक रुग्णालय, परेल,**
**मुंबई – 400 012.**

**बृहन्मुंबई महानगरपालिका**

**रा.ए.स्मारक रूग्णालय, परेल, मुंबई 400012**

**पावती क्र.-......................... दि.........**

**<u>अर्जाचा नमुना</u>**

पदाचे नाव:

प्रति,
अधिष्ठाता,
रा.ए.स्मारक
रूग्णालय, परेल,
मुंबई - 400012.

बृहन्मुंबई महानगरपालिकेत रा.ए.स्मारक रूग्णालय, परेल, मुंबई - 400012 येथे तात्पुरत्या स्वरूपातील ____________________ या पदाकरिता दिनांक _______________ च्या जाहिरातीनुसार मी खाली सही करणार विनंती अर्ज करत आहे.

माझी सविस्तर माहिती खालीलप्रमाणे आहे :

1) (अ) संपूर्ण नाव (आडनाव प्रथम) : ____________________________________________

2) दूरध्वनी क्रं. -

3) पत्ता (कायमचा) : ________________________________________________________

________________________________________________________________________

4) पत्ता (पत्रव्यवहाराचा) :______________________________________________________

5) पदाचे नाव ________________________

6) जन्म दिनांक: ______________________________

7) वजन: ________________ किलो उंची: ___________________ सें.मी.

8) वय:________________________

9) शैक्षणिक अर्हता: ______________________________________________________

मी यान्वये प्रतिज्ञापूर्वक असे जाहीर करतो / करते की, वरील माहिती जाणीवपूर्वक तसेच विश्वासपूर्वक दिली असून, ती खरी आहे. जाहिरातीत दिलेल्या सर्व निकषांवर व शैक्षणिक अर्हतेनुसार मी पात्र आहे. त्यापैकी कोणतीही माहिती खोटी आढळल्यामुळे माझा अर्ज फेटाळून लावल्यास किंवा निवडीच्या कुठल्याही टप्प्यावर माझी उमेदवारी रद्द केल्यास माझी काहीही तक्रार राहणार नाही.

**<u>सोबत : प्रमाणपत्रांच्या प्रमाणित प्रती</u>**

आपला / आपली विश्वासू,

अर्जदाराची सही

दिनांक

(अर्जदाराचे नाव)

**बृहन्मुंबई महानगरपालिका**
**रा.ए.स्मारक रूग्णालय, परेल, मुंबई 400012**
दूरध्वनी क्रं. -

<u>वैयक्तिक माहितीपत्र (BIO-DATA)</u>

1) संपूर्ण नाव (आडनांव प्रथम) मराठीत: ____________________________________

2) वडिलांचे संपूर्ण नाव: ____________________________________________

3) विवाहापूर्वीचे संपूर्ण नाव (महिलांकरिता): __________________________________

4) पत्ता : ________________________________________________________

________________________________________________________

5) दूरध्वनी क्रमांक:_______________________________________________

6) इ – मेल आय डी : _____________________________________________

7) लिंग– पुरुष _____________स्त्री ________________

8) जन्मदिनांक: दिनांक________ महिना________ वर्ष _________

दिनांक ______________ रोजी असलेले वय ________ महिने _______ दिवस____

9) शैक्षणिक अर्हता:

| शैक्षणिक अर्हता | शालांत परीक्षा मंडळ/विद्यापीठाचे नाव | गुणांचा तपशील | | | उच्च माध्यमिक शालांत परीक्षेतील गुण | | उमेदवार किती प्रयत्नात परीक्षा उत्तीर्ण झाला |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | प्राप्त गुण | पैकी | टक्केवारी | मराठी | इंग्रजी | |
| दहावी | | | | | | | |
| बारावी | | | | | | | |
| पदवी | | | | | | | |
| पदविका | | | | | | | |
| पदव्युत्तर | | | | | | | |
| फेलोशिप | | | | | | | |

10) अनुभव: ______________________________________

11) स्थानिक पोलीस ठाण्याचा पूर्ण पत्ता: __________________________________

________________________________________________________

12) उंची: ___ फूट __ इंच, वजन: _____ कि.ग्रा., शरीराची ठेवण: किरकोळ / मध्यम / सुदृढ वर्ण:

_________ नेत्र वर्ण: _________ वैयक्तिक खूण:_________________

13) संगणकविषयक ज्ञान: MS-CIT किंवा शासनाने विहित

केलेल्या संगणक विषयक अभ्यासक्रमाचे प्रमाणपत्र: आहे / नाही

14) उमेदवार सध्या नोकरी करीत आहे किंवा नाही ? होय / नाही

असल्यास त्याबाबतचा तपशील: ________________________________________

_____________________________________________________________________

15) उमेदवाराविरुद्ध पोलीस चौकशी / न्यायालयिन प्रकरण प्रलंबित / प्रस्तावित आहे का ? असल्यास त्याबाबतचा तपशील द्यावा. होय / नाही

16) उमेदवारास पूर्वी शिक्षा झाली होती का ? शिक्षा झाली असल्यास, शिक्षेचा तपशील नमूद करण्यात यावा व न्यायालयीन निर्णयाची प्रमाणित प्रत अर्जासोबत जोडण्यात यावी. होय / नाही

आपला / आपली विश्वासू,

अर्जदाराची सही
(अर्जदाराचे नाव)

दिनांक: